
# स्व:-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त १९९०-९१



কে লইবে মোর কার্য, কহে সন্ধ্যারবি
শুনিয়া জগৎ রহে নিরুত্তর ছবি।
মাটির প্রদীপ ছিল, সে কহিল, স্বামী,
আমার যেটুকু সাধ্য করিব তা আমি।।

রবীন্দ্রনাথ ঠাকুর

‘स्व’-रूपवर्धिनी

# कार्यवृत्त

१९९०-९१

# • आदर्शासाठी धडपडणारं जीवन •

*ध्येयपूर्तीसाठी त्यानं एक मार्ग निश्चित केला आहे आणि इतर सर्व दरवाजे त्यानं स्वत:साठी बंद केलेले आहेत. इतरांच्या स्वातंत्र्यासंबंधीच्या कल्पना त्याला रुचत नाहीत, तो त्या स्वीकारीतही नाही. इतरांना बंधनकारक वाटणारा मार्ग त्याला ध्येयाकडे नेणारा राजमार्ग वाटतो! इतरांना त्याचं वागणं वेडेपणाचं वाटतं, पण तो स्वत: मात्र समाधानी असतो. एखाद्या अदर्शासाठी लोक आपलं जीवन पणाला लावण्यास तयार असतात. तत्त्वासाठी आमरण उपोषण करणारा माणूस इतरांच्या दृष्टीने मूर्खही ठरू शकतो. अशा प्रकारे मूल्य, दर्जा आणि दृष्टिकोण यांमध्ये फरक असतो. आदर्शासाठी धडपडणारं जीवन हे क्षणिक सुखामागे धावणाऱ्या जीवनापेक्षा निश्चितच श्रेष्ठ आहे. आपल्या जीवनात सुसूत्रता असल्याचा ध्येयपूर्ण व्यक्तीला विश्वास असतो आणि आपलं ध्येय साकार करण्यासाठी हजार लोकांना संघटनेच्या सूत्रात गुंफणं त्याला सहज शक्य होतं.*

**—श्री. एकनाथजी रानडे**

# • अ नु क्र म णि का •

प्रस्तावना

मुखपृष्ठ कवितेचा अर्थ

'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच ----------

प्रार्थना

दीपस्तंभ

वाटचाल ९०-९१ मधील

शिबिर संकलन

रविवारची मेजवानी

प्रगतीच्या पाऊलखुणा

प्रेरणा जागृती – सौ. बागेश्री पोंक्षे

संपर्काचा परिसस्पर्श – श्री. शिरीष पटवर्धन

आमचे उत्सव .......... आजच्या अपेक्षा – श्री. जितेंद्र पवार

आशेची किरणे

विचार आणि आचार

आवाहन

आर्थिक ताळेबंद


कार्यकारिणी

दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

# • प्र स्ता व ना •

*'स्व' रूपवर्धिनी सुरू होऊन तेरा वर्षे झाली. त्या तेरा वर्षातील कार्याचा आलेख आम्ही वेळोवेळी आपल्यापुढे सादर केला आहे. गेल्या शैक्षणिक वर्षातील 'स्व' रूपवर्धिनीच्या कार्याचा हा मागोवा*

*सगळीकडे सध्या अनेक गंभीर प्रश्नांचे सावट पडले आहे. या नैराश्यमयी अंधारात 'स्व' रूपवर्धिनी नावाची मिणमिणती ज्योत प्रकाशदायी भासत आहे. ही मिणमिणती ज्योत एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे......संक्रमित करून निबिड अंध:काराचं, आसमंत उजळणाऱ्या प्रकाशात रुपांतर करावे.......एका दिपाची दीपमाळ उजळावी आणि त्यात नैराश्याचं मळभ विरून जावे यासाठीच हा प्रयत्न.*



# • मुखपृष्ठ कवितेचा अर्थ •

*मुखपृष्ठावरील कविता बंगाली भाषेतील असून सुप्रसिद्ध कवि रविंद्रनाथ ठाकुर यांची आहे. ती त्यांच्याच हस्ताक्षरातील आहे.*

* * *

*उच्चारण्याची पद्धत*

*के लइबे मोर काजों, कहे शन्धारवि*
*शुनिया जगत् रहे निरुत्तर छबि।*
*माटिर प्रदिप छिलो, शे कहिलो, श्शामी,*
*आमार जेटकू शाध्धो करिबो त आमि ।*

* * *

*पश्चिमेचा सूर्य करी; जगताला आवाहन,*
*कोण. करील दूर; अंधाराचे आच्छादन!*
*दूरवर क्षितिजावर एक ज्योत मिणमिणती;*
*मधुर स्वरात किणकिणली,*
*'कशास पडली तुजला धास्ती!*
*प्रकाशाची पिले आम्ही,*
*मनामनात फुलवू ज्योती,*
*'स्व' त्वाच्या स्पर्शांनी*
*उजळू सारी अंबर, धरती.*

अनुवाद
**श्री. संजय तांबट**

मुखपृष्ठ रेखाटन :
**श्री. दि. दा. जोशी**

• • •

मुखपृष्ठ कल्पना :
**श्री. माधव पुरोहित**

# • 'स्व' रूपवर्धिनी म्हणजेच •

☞ *सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडविणारी संस्था*

☞ *व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्या द्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ*

☞ *आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपला वाटणारा, परिवार*

☞ *विपरीत परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा.*

☞ *राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक संभाव्य 'राष्ट्रीय प्रकल्प.'*

☞ *परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी आपुलकी निर्माण करणारी संघटना.*

☞ *शाळेत प्रतिज्ञा फक्त म्हणून घेतली जाते. ती प्रतिज्ञा अंगी बाणावी, भिनावी व कृतीतून पाझरावी यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून देशाची गरज पूर्ण करू इच्छिणारा दूरलक्ष्यी उपक्रम*

☞ *अर्थात, ही पूर्णवेळची शाळा नाही. शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शैक्षणिक प्रकल्प.*

❋ ❋ ❋

## • प्रा र्थ ना •

*नमस्कार देवा तुला आमुचा हा*
*करी आमुची मायभूमी महा॥*

*हिचे रूप चैतन्यशाली दिसावे*
*जगाला कळावी हिची थोरवी ।*
*स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही*
*हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।*
*अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे*
*म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥१॥*

*जनांचा प्रवाहो इथे चाललेला*
*सदा संस्कृतीच्या मुळापासुनी*
*पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या*
*आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी*
*तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला*
*तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥*

*स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने*
*बनो शुद्ध बुद्धीहि तेजस्विनी*
*शरिरास आरोग्य, संकल्प चित्ती*
*नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।*
*पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,*
*घडावी विवेकी कृती- ध्यास हा ॥३॥*

*प्रभो तू चिदानंदरूपी असोनी*
*अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।*
*तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे*
*पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।*
*पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ*
*प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥*

* * *

## • दीपस्तंभ •

- पत वाढवा, पेढी नको
- मी नाही, 'तू'
- नुसती सेवा नको सेवेतून सेवेकरी उत्पन्न झाले पाहिजेत.
- समाजसेवी संस्थेचे सभासदत्व म्हणजे दागिना नव्हे; व्रत आहे.
- संस्थेमुळे मान नको; आपल्या मानामुळे संस्थेचा मान.
- शिक्षणात काटकसर नको, काटकसरीचे शिक्षण मात्र हवे.
- आचारातून विचार शिकवा.
- रागात किंवा मत्सरात वाया जाणारी शक्ती केवळ एका क्षमेमुळे वाचते.
- मदतीची बुद्धी असेल तरच दोषदर्शन सहन होते.
- अपयशाचे ९९ टक्के कारण सबबीची सवय हेच असते.
- पहिल्याने हृदय जिंका मग बुद्धीला आवाहन करा.
- शब्दाच्या शैलीपेक्षा शीलाला जास्त महत्त्व आहे.
- अलंकारिक बोलण्यापेक्षा अलंकारा-सारखी कृती अधिक लाभदायक !

*With Best Compliments from :*

**M/s. Metafin Processor And**
**Brite Electroplates**

Tophkana Shivajinagar, Pune 411 005.

## वाटचाल ९०-९१ मधील

✣ **२ ऑगस्ट ते ३ नोव्हेंबर १९९०.**
३ महिन्यांचा होमनर्सिंग कोर्स सुरू झाला.

✣ **७ सप्टेंबर, १९९०.**
दूरदर्शनवर कार्यक्रम झाला.

✣ पुणे सेवासदनच्या प्रौढ शाळेतील मुली वर्धिनी पाहायला आल्या होत्या.

✣ **१३ ऑक्टो. ते ४ नोव्हें. १९९०**
दहावी अभ्यास शिबिरसंख्या २० – त्यांच्या दोन्ही वेळच्या जेवणाची संपूर्ण व्यवस्था रामकृष्ण शाखेतील मुलांनीच घरोघरचे डबे आणून केली.

✣ **१२ नोव्हेंबर, १९९०**
सरकारी योजनेप्रमाणे अनूसूचित जाती व भटक्या व विमुक्त जमाती यातील गरजु उद्योजक महिलांना कर्ज मिळविण्यासाठी २५ महिलांची बैठक झाली. त्यापैकी १८ महिलांना २ ते १० हजार पर्यंत कर्ज मिळाले. शिवण वर्गात २८ महिलांनी सहभाग घेतला.

✣ **२६ ते ३० डिसेंबर १९९०**
'रामकृष्ण शाखेचे शिबीर'– विषय - इतिहास, या शिबीरात ज्ञानदा प्रतिष्ठानची पाच मुले आली होती.

✣ **२६ ते ३० डिसेंबर १९९०**
मुलींचे शिबीर झाले. विषय– 'रचनात्मक कार्याच्या दिशा.'

✣ 'अखंडानंद व 'विवेकानंद' शाखेतील मुलांची 'राजगड सहल'. या सहलीला ७८ मुले होती.

✣ **८ जानेवारी, १९९१**
आसामातील विद्यार्थी वर्धिनी पाहायला आले होते.

✣ **१२ जानेवारी १९९१**
फुलगावला संजय तांबट व गणेश राऊत यांचे तेथील मुलांसमोर वर्धिनी संबंधी बोलणे.

✣ **२० जानेवारी १९९१**
संक्रांत उत्सव- अध्यक्ष – जिल्हाधिकारी श्री. श्रीनिवास पाटील.

✣ **३० जानेवारी १९९१**
उपाध्यक्ष मा. आण्णासाहेब गोगावले यांचा स्वातंत्र्य सैनिक म्हणून महानगरपालिकेत सत्कार.

✣ **१० फेब्रुवारी, १९९१**
विवेकानंद शाखेचा स्नेहमेळावा – उपस्थिती १२५. केंद्रसरकारचे माजी वित्त सचिव श्री. यार्दी यांचे भाषण.

✣ **१२ फेब्रुवारी, १९९१**
महाशिवरात्रीनिमित्त तीनही शाखेतील ७० मुलांची पहाटे पर्वतीची सहल.

✣ ज्ञानप्रबोधिनिच्या मुलांचे आंबेडकरांच्या जीवनावर वर्धिनीत पथनाट्य.

✣ **१७ फेब्रुवरी, १९९१**
१० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना 'शुभेच्छा समारंभ' अध्यक्ष – श्री. शरद वाघ.


हार्दिक शुभेच्छा!

**मे. रमणलाल ट्रेडिंग कंपनी**

२३ भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे ४११ ००२.

नारळ, मिरची व किराणा मालाचे दलाल

फोन : रेसि : २०९६८
ऑफिस : दुकान : २१४७६

- **२४ फेब्रुवारी, १९९१**
  हरियाना, कर्नाटक, मध्यप्रदेश कार्यकर्ते वर्धिनी पाहायला आले होते.
- २६ मुले 'आंबेडकर अभिवादन मेळाव्याला मुंबईला गेली होती.
- **१८ एप्रिल, १९९१**
  दूरदर्शनवर कार्यक्रम झाला.
- **२२ एप्रिल ते १ जून ९१**
  उन्हाळ्याच्या सुट्टीत १० वीच्या ३५ विद्यार्थ्यांचा अभ्यास वर्ग.
- **२४ एप्रिल ते २ मे १९९१**
  मुलींचे दोन गटात शिबिर –
  'विषय – कलांचे रसग्रहण'
- **२ मे ते १० मे १९९१**
  मुलांचे ' कलाविष्कार शिबिर उपस्थिती १७५. औरंगाबादहून ११ मुले शिबिरासाठी आली होती.
- संतोष जगतापने १२ मुलांची कोरीगडला सहल नेली होती.
- **३१ मे, १९९१**
  ६० महिलांचे दिवसभराचे शिबिर झाले. वक्त्या – डॉ. सुमतीबाई कानिटकर व सौ. शोभना रानडे.

• • •

**• लक्षणीय घटना •**

* संजय तांबट उच्च द्वितीय श्रेणी मिळवून एम. ए. झाला.
* गणेश विसर्जन मिरवणूकीत 'शिशुंनी अभिनय गीत सादर केले. त्यांचा कार्यक्रम पाहून महापौरांनी ५०१ रुपयांची देणगी दिली.
* १८ नोव्हेंबर १९९० रोजी विलास कुलकर्णीने संभाजीनगरला शाखा सुरू केली. त्याचा भाऊ विश्वास हा बी.ई. होऊन त्याच्या मदतीला गेला आहे.
* १६ जानेवारी १९९१ - अजय कदमने स्वतःहून 'समर्थ रामदास शाखा सुरू केली.
* १० फेब्रुवारी १९९१ – आजूबाजूच्या वस्तीतील ३५ मुलांना शालांत परीक्षेसाठी श्री. सुनील कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.
* २२ फेब्रुवारी, १९९१ – राळेगणसिद्धीला 'अखिल भारतीय ग्रामविकास कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर झाले. तेथे श्रीहर्ष सगरे, संजय तांबट, संतोष जगताप हे स्वरूपवर्धिनीच्या वेगवेगळ्या प्रकल्पांची माहिती सांगण्यासाठी गेले होते.
* कु. मनिषा बोईन व सौ. संगिता भंडगे ह्या बेळगांवला देवदासींच्या शिबीराला गेल्या होत्या.


*With Best Compliments from :*

**ASHA CONSTRUCTION COMPANY**

Surekha Apartments, Opp. Octroi Naka,
Pune Satara Road, Pune 411 009. Tel : 431111

## शिबिर संकलन

### ● असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास .... तुका म्हणे ।।

दिवाळीची सुट्टी म्हणजे विद्यार्थ्यांचा अत्यंत आवडता कालावधी, धुमधडाका, आतषबाजी, रंगरंगोटी आणि मेवामिठाई यात सारेच दंग झालेले असतात पण वर्धिनीतील १० वी एकूण २५ वर्धक व विद्यार्थिनी मात्र सुट्टी लागली त्या दिवसापासून ते शाळा सुरू होईपर्यंत वरील साऱ्या प्रलोभनांना दूर सारून अभ्यास शिबीरात दाखल झाले.

सकाळी ५ ते रात्री १०.३० या कालावधीत अखंड अभ्यासाची उपासना मधेच थोडा वेळ शरीर आणि मन उल्हसित होण्यासाठी मैदानी खेळ आणि विविध प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करणे असा नित्याचा कार्यक्रम असे. वर्धिनीचे सर्व शिक्षक, तळमळीने सुट्टीचे दिवस असूनही भरदुपारच्या रणरणत्या उन्हात तासिका घेण्यासाठी येत.

ह्या शिबीराचे संचालन प्रामुख्याने श्री. सुनील कुलकर्णी, ज्ञानेश पुरंदरे, गिरीश अडके व पराग जगताप या युवा कार्यकर्त्यांनी केले.

रामकृष्ण शाखेच्या पालकांनी सकाळ- संध्याकाळ दोन्ही वेळा गरमागरम भोजन डब्यांतून शिबीरस्थानी पोचवून ५/६ मैलावर असलेल्या सर्व शाखांतून एकत्र असलेल्या आपल्या मुलांची भोजन व्यवस्था मायेने सांभाळली.

### ● जाणीव प्रश्नांची उपयोग अभिनयाचा ●

२८ एप्रिल ते २ मे या काळात मुलींचे दोन गटात शिबीर एस. एन. डी. टी. महाविद्यालयामध्ये झाले. या वर्षीचा शिबिराचा विषय 'कलांचे रसग्रहण' असा होता. या शिबिराचे प्रमुख म्हणून कु. रोहिणी तेंडुलकर व कु. मंगला कुडलिंगार यांनी काम पाहिले. यात खालील कलांची माहिती वेगवेगळ्या वक्त्यांनी दिली.

**लहान गट –**

१. देवदत्त पाठक - 'अभिनय कसा करावा'

२. बालभवन मधील सौ. शोभा भागवत व इतर कार्यकर्त्या रोज गाणी शिकवायला येत.

३. न्यू इंडिया ॲश्यूरन्स कंपनी तर्फे रस्ता सुरक्षा, विद्युत सुरक्षा आग, पाणी इ. विषयांवरील शैक्षणिक चित्रपट दाखविले. या शिवाय मेंदी काढायला शिकविली. लहान गटाच्या शिबीराचा समारोप श्री. दि. दा जोशी यांनी केला.

**मोठा गट –**

श्री. ग. म. केळकर – गांधीजीवन दर्शन

श्री. देवदत्त पाठक – 'अभिनय कसा करावा'

'जाणीव संघटना – पथनाट्य

श्री. माधव वझे – 'अभिनय'

या गटाच्या शिबीराचा समारोप श्रीमती विद्याताई बापट यांनी केला.

•••

With Best Complimnents From :

**M/s. Decent Decorators** 81 - D - 2. M.I.D.C. Chinchwad,
FOR QUALITY COATINGS PUNE 411 009.
Phones : 83730, 82333, 55417

## मुलांचे उन्हाळी शिबिर

दरवर्षीप्रमाणे मुलांचे उन्हाळी शिबिर मे ते १० मे या कालावधीत लॉ कॉलेज वसतीगृहात झाले. या वर्षीचा शिबीराचा विषय 'कलाविष्कार' असा होता. 'संस्कारभारती' या अखिलभारतीय संस्थेच्या सहाय्याने शिबिर पार पडले. या संस्थेच्या श्री. सुधीर पाचपोर, श्री. सुहास कुलकर्णी, श्री. उदयन इंदूरकर, श्री. संजय पुरंदरे यांचे विशेष सहाय्य झाले.

या शिबिराचा शिबिर प्रमुख म्हणून दत्ता शेडगे यांनी काम पाहिले. शिबीराला इतर तीन शाखांबरोबरच औरंगाबादहून ११ मुले आली होती.

शिबीराचा कार्यक्रम – मोठा गट -

उद्‌घाटन – श्री. राम कदम – 'संगीतातील स्वानुभव'

श्री. अजय पराड - समूहगान - 'हिरवी छाया हिरवी माया' व 'हम युवकोंका नारा है' ही दोन गाणी बसविली

श्री. दिग्विजय वैद्य – 'गप्पागोष्टीतून संगीत'

श्री. मधुसूदन घाणेकर- नाट्याभिनयातील विनोद'

श्री. शिरीष देशमुख – कोलार्ज– विविध प्रकारच्या कागदांनी चित्रकला

श्री. आनंद गुणे – 'रंग व रेषा यांचे सामर्थ्य'

श्री. दिलीप कुलकर्णी – 'कॅमेऱ्याची माहिति व छायाचित्रण कसे करावे.

श्री. राजाभाऊ लवळेकर – प्रात्यक्षिकासहीत चित्रपट रसग्रहण

श्री. अभय माटे – 'वाद्य परिचय'

श्री. श्रीपाद भावे – 'दिंडीचे प्रात्यक्षिक बसविले'

श्री. द. मा. मिरासदार – 'विनोदी कथा'

श्री. मंदार परळीकर – कथाकथन 'क्रांतीकारकांच्या कथा'

कु. देवदत्त बर्वे – 'बाल अभिनेत्याचे अनुभव

सौ. शोभा भागवत – 'कलागुणांची जोपासना कशी करावी' श्री. संजय पुरंदरे – शिल्पांचे सामर्थ्य व रायगड ह्या विषयांवर स्लाईड शो.

'जाणीव' संस्थेच्या साह्याने काही पथनाट्य बसविली. सुप्रसिद्ध अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर संपूर्ण दिवसभर मुलांबरोबर होते. त्यांनी आपले नाट्य क्षेत्रातले अनुभव व 'बेबंदशाही' व 'एकच प्याला' या नाटकातील उतारे प्रत्यक्ष करून दाखविले.

लहान गट

उद्‌घाटन – श्री. विवेक पोंक्षे ह्यांच्या हस्ते झाले.

श्री. शरद वाघ – 'छंद कसे जोपासावेत'

डॉ. अशोक निरफराके – 'कवितांची निर्मिती'

श्री. सुभाष देशपांडे – 'गोष्टी कशा सांगाव्यात'

श्री. देवदत्त पाठक – 'रंगमंच खेळ'

श्री. अनिल गोडबोले – 'कथाकथन'

श्री. सुभाष होनराव – 'कथाकथन'

शिबीरात लहान गटाला पोहायला शिकविले तसेच रस्ता सुरक्षा, विद्युत सुरक्षा, आकाशदर्शन या विषयावरील शैक्षणिक चित्रपट दाखविले.

दोन्ही गटाच्या शिबीराचा समारोप १० मे रोजी सकाळी ९ वा. श्री. सुरेशराव केतकर – अखिल भारतीय संस्कार भारतीचे प्रमुख यांच्या उपस्थितीत व श्री. सत्यरंजन साठे प्राचार्य, विधी महाविद्यालय यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

*With Best Complimnents From :*

**M/S. ELECTROMARK ASSOCIATES**

42 Electronic Estate
Pune - Satara Road,
Pune 411 009.

## • युवक शिबिर •

युवकांचे निवासी शिबिर ३० जून ते ४ जुलै १९९० या कालावधीत एस. ओ. एस. बालग्राम येथे पार पडले. शिबीराचा हेतू प्रेरणा जागृती व वार्षिक नियोजन असा होता.

या शिबीरात खालील वक्त्यांची व्याख्याने झाली.

- श्री. य. शं. लेले–
  **'हिंदूस्थानचे जगातील स्थान'**
- श्री. सुहासराव हिरेमठ –
  **'संपर्कातील अनुभव'**
- प्रा. शरद वाघ –
  **'तासिका कशा घ्याव्यात'**
- श्री. राजाभाऊ लवळेकर –
  **संपर्क कसा साधावा-तंत्र व पथ्य'**
- श्री. सुभाषराव देशपांडे –
  **सामाजिक कार्य वैयक्तिक प्रगतीला अडथळा आणते का?**
- श्री. कृ. ल. पटवर्धन –
  **आम्हाला नेमके काय साधायचे आहे?**
- श्री. दामुअण्णा दाते –
  **कार्यकर्त्यांचा एकमेकाशी व्यवहार कसा असावा.**
- श्री. दि. दा. जोशी –
  **प्रवर्तक – मुक्त चिंतन**

एकूणच काम करताना आपल्याला जाणवणाऱ्या अडचणी, त्रुटी व त्याबाबतचे उपाय याचा शिबीरात विचार झाला.

## • रविवारची मेजवानी •

| | |
|---|---|
| श्री. संजय तांबट | – 'भारतातील विघटन-वादी चळवळी' |
| डॉ. शरद कुंटे | – 'फाळणीचा इतिहास' |
| प्रा. बाचल | – 'घटनेचे २५ वे २६ वे कलम' (मूलभूत हक्क) |
| प्रा. गिरीश बापट | – 'विज्ञान व अध्यात्म |
| श्री. वि. ना. देवधर | – 'सध्याची देशस्थिती' |
| लेफ्टनंट जन. चिमा | – 'आखाती युद्ध' |
| कु. स्मिता देशपांडे | – 'नागालॅण्डचे अनुभव' |
| श्री. मिलिंद लेले | – 'काश्मिरचे अनुभव' |
| डॉ. दिवाकर कुलकर्णी | – 'आंबेडकर प्रतिष्ठान व हेडगेवार रुग्णालयाची माहिती' |
| कु. मनिषा बोईन व सौ. संगिता भंडगे | – देवदासींचे प्रश्न' |
| डॉ. अशोक कुकडे | – 'विवेकानंद रुग्णालय-लातूर' अनुभवकथन |
| श्री. जोशी | – 'परदेशी वकिलातीतील अनुभव' |
| डॉ. प्रमोद लाळे | – 'आजच्या संदर्भात वेद व उपनिषदे' |


*With Best Compliments from*

**M/S BALDOTA SAMAL AND ASSOCIATES**

"Darshan"
1,B. J. Road,
Pune – 411 001.
☏ 663737/666844

# प्रगतीच्या पाऊलखुणा

## 'आकार'

नोव्हेंबर १९९० मध्ये मुलींचे 'रचनात्मक कार्याच्या दिशा' या विषयावरील शिबिर सौ. बागेश्री पोक्षे यांच्या नेतृत्वाखाली झाले. या शिबीराची फलश्रुती म्हणजे 'आकार' प्रकल्प. हा प्रकल्प इ. ९ वी तील विद्यार्थिनींनी सुरू केला. यात उपेक्षित वस्तीतील १ ली ते ४ थी पर्यंतच्या मुलामुलींना आठवड्यातून दोनदा एकत्र जमवून त्यांना गाणी, गोष्टी, खेळ अभ्यास इ. गोष्टी शिकविल्या जातात.

या प्रकल्पासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद व्हावी म्हणून यात काम करणाऱ्या विद्यार्थिनींनी तो खर्च स्वरूपवर्धिनीच्या कोशातून न घेता अनेक व्यक्तींना भेटून त्यांना या प्रकल्पाची माहिती सांगून देणगीरूपाने पैसे गोळा केले व त्याचा हिशोब वर्धिनीला दिला आहे.

मार्च १९९० मध्ये झालेल्या वार्षिक परीक्षेत या प्रकल्पांत येणाऱ्या सर्व मुलामुलींना ७०% च्या वर गुण मिळालेले आहेत. या प्रकल्पाची जबाबदारी प्रामुख्याने सुवर्णा बर्डीवाले, अर्चना कदम, दिपाली पवार, शिवानी निजामपूरकर या विद्यार्थीनी सांभाळतात.

## कुंभारवाडा उपशाखा

ही उपशाखा नुकतीच सुरू झाली. यात इ. १ ली ते ९ वी पर्यंतच्या २२ विद्यार्थीनी सहभागी आहेत. ही शाखा कुंभारवाड्यातील देवळात आठवड्यातून तीन दिवस चालते. यात ४५ मिनिटे गाणी, गोष्टी व खेळ होतो तर नंतरची ४५ मिनिटे अभ्यास असतो.

या उपशाखेची जबाबदारी कु. मनिषा बोईन व कु. संगिता बारणे या युवती सांभाळतात.

शाखेचे कार्य सुसंस्कारित मने घडविण्याचे असल्याने त्या दृष्टीने अडीच महिने हा कालावधी खूपच लहान आहे. एवढ्या थोड्या कालावधीत त्याची फळे तर दिसणार नाहीत पण कुठेतरी अंकूर फुटतो आहे हे जाणवते. जर एखाद्या दिवशी ताईला जायला उशीर झाला तर या मुली खेळ घेतात. गाणी म्हणतात. अभ्यास करतात. पण ताई फक्त आठवड्यातून तीन दिवसच येते ही खंत त्या व्यक्त करतात.

## समर्थ रामदास शाखा

'स्व'-रुपवर्धिनीच्या आजुबाजूचा भाग तसा अविकसित! त्याचे मुख्य कारण म्हणजे गरिबी व शिक्षणाचा अभाव, व्यसनाधीन पालक त्यामुळे त्यांचे मुलांकडे दुर्लक्ष होते. मुले शाळेत न जाता बाहेर भटकतात. समाजहित विरोधी वागतात. हे सर्व करणारी मुले फक्त वयोगट ७ ते १२ वर्षे पर्यंतचीच आहेत. या मुलांना जर आपण चांगले शिक्षण देऊन त्यांच्यावर चांगले संस्कार केले तर हीच मुले पुढे समाजविरोधी कारवाया करण्यापासून, गुंड होण्यापासून वाचू शकतील व त्यांना त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त शक्तीची व कलागुणांची जर जाणीव करून दिली तर ही मुलेही समाजात ताठ मानेने उभी राहू शकतील व एकूणच त्याचेही भवितव्य उज्ज्वल होईल. याच दृष्टिकोणातून अजय कदमने स्वयंप्रेरणेने 'स्व'-रुप वर्धिनीच्या वास्तूत ही शाखा सुरू केली व हळूहळू आकार घेऊ लागली.

या मुलांना सुरुवातीला फक्त एकत्र बसवून घेऊन गाणी, गप्पा, गोष्टी हेच कार्यक्रम ठेवले होते. येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या घरी वर्धिनीचे कार्यकर्ते संपर्क ठेवू लागले. त्यातून पालकांच्या अभ्यासाबद्दल तक्रारी लक्षात आल्या. ह्यावरून त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्याची किंवा त्यांची किमान अभ्यासाला बसण्याची तयारी व्हावी म्हणून सायं ७.३० ते ८.१५ पर्यंत अभ्यास चालू केला. मुलांना हळूहळू अभ्यासात गोडी वाटू लागली. माधव पुरोहित हा युवक कार्यकर्ता या शाखेचा शाखाप्रमुख म्हणून काम पाहतो. भीमनगर, गाडीतळ

वस्तीतील मुलेही येऊ लागली. या शाखेची संख्या ७५ ते ८० राहू लागली. या शाखेत निवडचाचणी न घेता त्या गटातल्या सर्व मुलांना प्रवेश दिला.

या मुलांच्या गुणात्मक वाढीच्या दृष्टिकोणातूनही तेवढेच प्रयत्न करायला हवे म्हणून परत विचार सुरू झाले. रामकृष्ण शाखेतील नुकतेच १० वी, १२ वी झालेली मुले काम करू लागली. त्यात खालील कार्यकर्ते काम करतात. सुनिल वाल्मिक, प्रशांत बोरुडे, विवेक जोशी, अश्विन शहा, सुभाष चलवादी, राजेश मुप्पीड.

या शाखेत इ. १ली ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी येतात. प्रत्येक इयत्तेत साधारण १२ ते १५ मूले आहेत. दर शनिवारी त्यांना चित्रकला, हस्ताक्षर सुधारणा व अन्य तत्सम कला शिक्षण दिले जाते. तसेच दर रविवारी विविध विषयांवरील व्याख्याने होतात.

मुलांना रोज आंघोळ करणे, दात घासणे, रात्री जेवणानंतर दात घासणे वा चूळ भरणे, रोज तीन तास अभ्यास करणे व झोपताना आई वडिलांच्या पाया पडणे वगैरे गोष्टी आवर्जून सांगितल्या जातात. या गोष्टी मुलांना व पालकांनाही नवीन होत्या. त्याचा खूपच चांगला परिणाम होत आहे.


*With Best Compliments from*

**M/S LANDMARK CONSTRUCTIONS**

"Darshan"
1, B. J. Road,
Pune – 411 001.
☏ 666844


## प्रेरणा जागृती

एका कृश, काटकुळ्या, काळ्याकुट्ट आणि थोड्याश्या कुरुप मुलाला मी एकदा एका पुस्तकात पाहिलं. खरंतर त्याची एकंदर शारीरिक, आर्थिक, सामाजिक परिस्थिती वाचून तो इतके दिवस जगला कसा? असं कोडं मला पडलं आणि जसजशी मी त्याला वाचत गेले तसतसा एखाद्या अद्भूत रहस्यमय कथेतल्या जादुगाराने प्रचंड,अफाट संपत्तीचा खजिना आपल्या- समोर उघडावा आणि त्यातल्या माणिक, मोती व रत्नांनी आपले डोळे दिपून जावेत अन् समोरचे काहीही न दिसता नुसता प्रकाशंच प्रकाश चहूकडे भासावा तसे झाले. खरं तर माझा विश्वासच बसला नाही. ज्याला लहानपणापासून आई वडिलांचे नव्हे तर त्यांचे नाव देखील माहीत नाही. तो छोटासा 'जॉर्ज कार्व्हर' एक जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ, संशोधक आणि स्वत:चे आयुष्य लोकांवर उधळून टाकणारा' मनस्वी महामानव कसा बनला?

मला वाटते माझ्या सारखीच तुम्हालाही अशी माणसे प्रत्यक्षाप्रत्यक्ष भेटतात आणि मग तुमचाही तो सबंध दिवस असाच अस्वस्थतेत आणि हुरहुरत, चुटपुटत जातो. विशेषत: ही माणसं आपल्या रोजच्या नीरस-बेचव आयुष्याला एक वेगळीच रुपेरी झालर लावतात आणि कधी-कधी यांमध्ये आपल्या नित्य सहवासातली, जवळची माणसं पाहून आपल्याला सुखद, आनंददायी धक्काच बसतो आणि आपण जवळजवळ मनातल्या मनात किंचाळतोच की "अरेच्च्या! ही कध ी एकदम मोठ्ठी झाली" अशी आता डोळ्यातही मावेनाशी आणि हातातही सापडेनाशी कशी झाली? खरं तर ही माणसं सुद्धा, आपण खातो तसलेच अन्न खातात आणि त्याच तर हवेत श्वास घेतात.

मग सगळ्यांशी जाणीवपूर्ण बोलतांना आपल्याला त्यांच्यातले वैशिष्ट्य जाणवते. त्यांच्याजवळ गेल्यावर जाणवते त्यांच्या अस्वस्थतेला आणि मनातील आगीला त्यांनी त्यांच्या कृतीशील चारित्र्यसंपन्न नि:स्वार्थी आयुष्यातून दिलेला आकार!

मनात जागलेली प्रेरणा एवढे काही करू शकते? हो - जरूर करू शकते! ती जोरावरसिंह आणि फतेसिंह

सारख्या ७ आणि ५ वर्षांच्या बालकांच्या मनात धर्मासाठी प्राणार्पण करण्याचे धगधगते धैर्य ओतू शकते. ती झाशीच्या राणीच्या मातृहृदयालाही आवर घालून कोवळ्या दामोदरला पाठीशी बांधून स्वराष्ट्रासाठी जीवावर उदार होते.

ती कधी गावोगावी, खेडोपाडी, मुलांमागे पाणवठ्यावर फिरत त्यांच्या आयुष्याच्या काळ्यापाट्यांवर त्यांच्या उष:कालाचा श्रीगणेशा काढणाऱ्या वृद्ध मा. अनुताईंचे रूप घेते तर कधी समाजाने ज्यांना कधीही जवळ केले नाही अशा वारांगनांच्या मुलांसाठी विजयाताई लवाटे बनते. अशी एक नाही दोन नाही नुसती इतिहासजमा नाही तर वर्तमानाच्या छातीवर पाय रोवून अखंडपणे अहर्निशपणे कोणत्याना कोणत्या क्षेत्रात आपला ठसा उमटवणारी प्रचंड शक्तीची माणसे आपण पाहतो आणि सहजच मनात आपली त्यांच्याशी तुलना करतो. अशा वेळेला मला उल्लेख करावासा वाटतो तो स्वरूपवर्धिनीचाच!

स्वत:च्या उत्कर्षाच्या प्रेरणेने काम करणाऱ्या, समाजाच्या विशिष्ठ गटाच्या,जाती जमाती वर्गाच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्थाही असतात. परंतु कोणाच्यातरी उत्कर्षाकरता आम्ही काही करता नाही तर समाजात समर्थ खांद्यांचे, स्वच्छ मनांचे, खंदे कार्यकर्ते आम्हांला निर्माण करावयाचे आहेत अशा हेतूने गेली १३ वर्षे अहर्निशपणे आपले प्रेरणा जागृतीचे काम चालू ठेवणारी अशी ही संस्था.

कारण आजकाल शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, सर्वांगीण विकास, अशासारख्या संकल्पनांमध्ये प्रेरणा जागृतीचा हा अत्यंत महत्त्वाचा विषय, पालक, परिवार, परिसर आणि पाठशाळा यांमधून दुर्लक्षित राहिलेला आहे आणि बरोबर तोच विषय स्वरूपवर्धिनीने उचलून धरला आहे.

बरे, कोणत्याही प्रकारच्या 'व्याख्यानांचा प्रचंड भडिमार' किंवा 'वैचारिक चर्चासत्राचे येता जाता पाऊस' पाडून काही प्रेरणा जागृती करता येत नाही; त्याला 'आधी केले, मग सांगितले', 'बोले तैसा चाले', 'रात्रंदिन आम्हां कार्याचा हा ध्यास' अशासारख्या उक्ती जगणाऱ्या माणसांचा सहज, अनौपचारिक सहवासही पुरेसा ठरतो याची अनेक उदाहरणे देता येतील.

कोणी एक साठी ओलांडलेले करंदीकर सर जर सूर्यनमस्कार शिकविण्यासाठी प्रत्येक दिवशी नित्य नव्या उत्साहाने आणि तरुणालाही लाजवील अशा कार्यप्रवणतेने मुलांमध्ये मिळून-मिसळून स्वत: जोर बैठकाही काढायला मागेपुढे पाहाणार नसतील तर शाखेतील मुलं काय बिशाद आहे, नमस्कार घालणार नाहीत म्हणून?

शाखेतल्या शिक्षकांची मुलांसाठी सतत काहीतरी करीत राहण्याची धडपड, एखाद्या सुनिल कुलकर्णी सरांची स्वत:च्या घरगुती जबाबदाऱ्या व नोकरी सगळे सांभाळून सतत जास्तीत जास्त वेळ वर्धिनीसाठी कसा खर्च करता येईल या विचाराने केलेली दैनंदिनीची रचना, स्वत:चा अभ्यास सांभाळून, पहिला नंबर टिकवूनही निरनिराळ्या शाखांवर लांब लांब सायकलीवरून जाऊन मुलांशी या ना त्या प्रकारे सतत संपर्क ठेवणारे युवक विभागाचे शिक्षक, शाखेतील अशा एक ना दोन अनेक गोष्टी शाखेतील विद्यार्थी उघड्या डोळ्यांनी पाहात असतात. वाढदिवशी शाखेतल्या शिक्षकांनी दिलेलं छोटसं गुलाबाचं फुल आपल्या छोट्याश्या, गैरसोयींनी युक्त अशा पडक्या घरात येऊन कोण्या एका अजय सरांनी आपल्या मांडीला मांडी लावून केलेलं जेवण, शनिवारी होणाऱ्या व्याख्यानांमधून भेटणाऱ्या वेगवेगळ्या सामाजिक कार्यात झोकून देऊन काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे विलक्षण अनूभव, परीक्षेतील यशानंतर पाठीवर पडणारी कौतुकाची थाप 'धन्या, लेका ऐकत नाहीस हां आता, मोठ्ठी माणसं झालात बरे का!' अशी कृ. ल. पटवर्धनांनी केलेली सलगीवजा जवळीक.

अशा छोट्या छोट्या दिसणाऱ्या गोष्टी मुलांना खूप खूप आनंद देतात आणि त्यातूनच त्यांच्यात शाखेसाठी काहीतरी करण्याची इच्छा हळूहळू निर्माण होते. या इच्छेचे रुपांतर वर्धिनीसाठी काहीही करण्याच्या प्रेरणेत कधी होते हे कळतही नाही आणि या इच्छेचे,प्रेरणेचे रुपांतर प्रत्यक्ष काम करण्याच्या जिद्दीत झालेले मी प्रत्यक्ष या डोळ्यांनी पाहिले आहे, अनुभवलेही आहे.

**— सौ. बागेश्री पोंक्षे**

## संपर्काचा परीसस्पर्श

'स्व'-रूपवर्धिनीचे काम सुरू होऊन एक तप लोटलं. कामाचा विस्तारही होतो आहे. पाहता पाहता स्वतःच्या वास्तूत येऊन तीन वर्षे होऊन गेली. या मोठ्या वास्तूमध्ये सतत काही ना काही समाजाला उपयुक्त अशी कामे चालू असली पाहिजेत या कल्पनेतून अनेक नवीन प्रकल्प सुरू झाले. हळूहळू आकार धारण करीत आहेत ते सारं चित्र डोळ्यांसमोर आलं की लक्षात यायला लागतं या विस्ताराचा आधार काय बरे असेल? ...... अर्थातच संपर्क..... वैयक्तिक संपर्क.....

आज वर्धिनीमध्ये अनेक कुटुंबे अशी आहेत की ज्या घरी कार्यकर्त्यांचा संपर्क झाला नाही तर प्रेमाने रागावणाऱ्या आया आहेत. वर्धिनी हे एक मोठे कुटुंब बनत चाललं आहे आणि त्यामुळे कौटुंबिक जिव्हाळ्याच्या वातावरणात अनेक जणांचे हात कार्यवाढीला लागत आहेत. वेगळेपण आहे ते इथेच. केवळ तीन तास शाखेपुरते, एखाद्या प्रकल्पाच्या ठरलेल्या वेळापुरते कार्यकर्त्यांचे एकमेकांशी संबंध मर्यादित राहिलेले नाहीत तर उरलेल्या २१ तासांमध्येही ऋणानुबंधांचे स्मरण कार्यकर्त्यांना, वर्धकांना राहात असते.

एकमेकांच्या सहवासात येणाऱ्या या दोन व्यक्ती (कार्यकर्ता- वर्धक) या नात्याने, मित्र मित्र या नात्याने एकमेकांवर कळत न कळत संस्कार करीत असतात. एकदा एका कार्यकर्त्याला आपल्या एका छोट्या वर्धकाकडे जाण्याचा प्रसंग आला. पाहता पाहता त्या छोट्याने एका बशीत जिलबीचे तुकडे त्या कार्यकर्त्यापुढे आणून ठेवले. या गरीब मित्राने जिलबी मुद्दाम आणली की काय अशी शंका येऊन तो कार्यकर्ताही सहजपणे म्हणाला, 'अरे हे एवढं करायची काही आवश्यकता होती का?' तो छोटाही काही कमी नव्हता तोही सहजपणे म्हणाला, 'तुम्ही आम्हाला रोज शिकविता, समजावून सांगता, त्या प्रेमळपणाने एवढंसं केलं तर कुठे बिघडलं?' निर्व्याज प्रेमाने आपण जे काम करतो त्याचा परिणाम कसा नकळत घडत असतो याचे दर्शन त्या छोट्याच्या उद्‌गारातून झाले. एकामुळे दुसऱ्यामधील कार्यकर्ता अधिक जागा झाला.

स्वतःच्या वास्तूत पहिला प्रकल्प बालवाडीच्या रूपाने सुरू झाला. त्याची जबाबदारी पेलणं काही सोपं नव्हतं. पुष्पाताईंच्या येण्याने ही जबाबदारी योग्य हाती पडली. बालवाडी संख्येने, गुणानी तर वाढतेच आहे. पुष्पाताईंचा आत्मविश्वासही दुणावला याचा प्रत्यय त्यांच्याशी गप्पा मारल्या की येतो. जीव ओतूनही, आईसारखी माया लावूनही पूर्वी ज्या संस्थेत काम केलं तेथे समाधान मिळत नव्हतं त्या पार्श्वभूमीवर "इथे तरी काय होणार आहे कोणास ठाऊक?" कदाचित अशा वातावरणात सुरुवात झाली. परंतु आता दापोडीला घरी जायला जीवावर येते, इथेच कुठे जवळपास राहाता आले तर बरे म्हणजे संध्याकाळच्या मुलींच्या शाखेतही काम करता येईल, इथंपर्यंत त्या गुंतल्या गेल्या. त्यांच्या सहवासात आलेल्या कार्यकर्त्यांना त्यांच्याकडे पाहिले की कामाचा झपाटा कसा असावा याचा न कळत बोध


*With Best Compliments from :*

**INTERNATIONAL TRADE SYNDICATE**

Dealers in : Dyes, Chemicals & Sizing Materails
Raw Material For plant Industries
(Glue Flakes Technical Gelatines synthetic reasins pigments etc.)
93/ 95. Perin Nariman, Bazargate Street, 2nd Floor, Fort, Bombay 400 001

होत असतो. तर अरे हे सगळे आपल्यापेक्षा जास्त शिकलेले; आपणही पुढे शिकले पाहिजे या तळमळीतून इथे आल्या तेव्हा फक्त एस्. एस्. सी. पास असलेल्या व आता बी.ए. च्या शेवटच्या वर्षाला आलेल्या पुष्पाताई. दोन्हीकडे ऐकमेकांच्या संपर्काच्या परिस–स्पर्शाचा जाणवलेला सुखद अनुभव.

वर्धिनीत मुलांना निवड चाचणी देऊन निवडले जाते तेही ५ वीत आल्यावर. चौथीपर्यंतची शाळा अर्धवट सोडलेले आणि ज्यांच्यावर केवळ "वाया गेलेली" हाच शिक्का मारला गेलेला अशा मुलांसाठी सुरू झालेली समर्थ शाखा मात्र हा शिक्का पुसून टाकण्यामध्ये एका वर्षातच समर्थ व्हावी ही सुद्धा जादू संपर्काचीच. "बरं! आपण असं करूया" अशा साध्या भाषेतून संवाद साधणारा अजय कदम उभा राहिला. पाहता पाहता या शाखेची जबाबदारी सांभाळणारे, माधव सारखे ६-७ कार्यकर्ते मिळाले. वस्तीत राहाणाऱ्या पालकांनाही मुलगा चांगला वागतो आहे. रात्री ९ नंतर रस्त्यावरचं खेळणं बंद झालं. शिव्या देणं कमी झालं हे मुलात होत असणारे बदल जाणवत आहेत आणि न कळत पालक सभेत एका पालकाची प्रतिक्रिया होती, "अरे, आपल्या मुलांसाठी वर्धिनी एवढं सगळं करीत आहे या कामाला आपणही काहीतरी मदत केलीच पाहिजे."

संपर्कातून सहवास, सहवासातून शिक्षण आणि शिक्षणातून (न कळत) संस्कार घडविणारे असे कितीतरी प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहातात कामाच्या वाढत्या व्यापात संपर्काचा हा परिसस्पर्श अतिशय मोलाचा आहे. तो जपला पाहिजे.

— **शिरीष पटवर्धन**

परिसाच्या संगे लोह बिघडले
लोह बी घडले सुवर्णची झाले
शिवबाच्या संगे ताना बिघडला
ताना बी घडला शिवरूप झाला

## ● आजचे उत्सव .... उद्याच्या अपेक्षा

'स्व' - रूपवर्धिनीच्या वार्षिक उत्सव उत्साहात पार पडला. नेहमीप्रमाणेच नवीन प्रात्यक्षिके, नव्या कल्पना व संपूर्णतया युवक गटाने यशस्वीपणे पार पाडलेला हा आणखी एक कार्यक्रम. यात वर्धिनी विषयी मत व्यक्त करताना एक युवक म्हणाला "शाळेत प्रतिज्ञा म्हणून घेतली जाते ती प्रतिज्ञा अंगी बाणावी, भिनावी व प्रत्यक्ष कृतीतून पाझरावी यासाठी शिक्षण या माध्यमातून काम करणारी वर्धिनी ही देशाची गरज आहे. त्यामुळे संस्कारित, अनुशासित व देशभक्त युवक तयार करणाऱ्या वर्धिनीच्या शाखा जास्तीत जास्त ठिकाणी सुरू झाला पाहिजेत."

मकर संक्रांतीच्या निमित्ताने होणाऱ्या या तिळगुळ समारंभात तर वर्धिनीच्या दरवर्षीच्या प्रगतीचा आलेख पहावयास मिळतो. त्याचवेळी समाजातून येणाऱ्या प्रतिक्रिया वर्धिनी विषयीच्या वाढत्या अपेक्षा व्यक्त करताना त्यावेळी युवक कार्यकर्त्यांवर त्या पूर्ण करण्याच्या जबाबदारीचे ओझेही येऊन पडते आणि संक्रांतीच्या वेळच्या आगळ्या वेगळ्या आकांक्षांचे स्नेहसंवर्धन युवक कार्यकर्त्यांना बळही देत असते. नवा उत्साह नवी स्फूर्ती, नवी दिशा घेऊन आपला दिनक्रम सुरू होतो.

कोणत्याही संस्थेतर्फे, समाजाच्या वतीने साजरे केले जाणारे उत्सव व सण हे त्या संस्थेच्या आशा, आकांक्षांचे प्रतिक असते. त्यांच्या प्रगतीची दिशा, त्यांचे अपेक्षित ध्येय व मूलगामी विचारांचे प्रतिबिंब अशा उत्सवात पहावयास मिळते. बदलत्या काळात देशापुढील समस्या काश्मीर, पंजाब, आसाम नागालँड यासारखी आव्हाने पाहाता यांना तोंड देण्यासाठी अखिल भारताने एकत्र व्हायला हवे आहे. भारतमातेचे रक्षण करण्यासाठी भारत मातेच्या एका सुपुत्राने दुसऱ्याला दिलेली राखी ही एक हाक आहे. त्याला जागृत करण्याचं रक्षाबंधन हे एक साधन आहे. आणि सर्व देशवासियांना भारतभक्तीच्या एकाच धाग्यात ओवण्यासाठी हा एक रेशमी धागाच उपयोगी पडणार आहे.

असाच आपला आणखी एक सण म्हणजे दिवाळी. याचंही स्वरूप आपण अशाच व्यापक दृष्टीकोणातून ठरविले आहे. दररोज आपण प्रार्थना म्हणतो,

"जनांचा प्रवाहो इथे चाललेला,
सदा संस्कृतीच्या मुळापासूनी,
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासूनी,
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हांला,
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा।

दिवाळीसारख्या सणाला आपण घरी गोडधोड करतो व आनंदाने त्याचा आस्वाद घेतो, पण त्यावेळी याचीही जाणीव आपल्या मनात असते की आपल्या आजूबाजूला कित्येक माणसे व वस्त्या आहेत की त्यांना याची चव सुद्धा माहीत नसते. या सर्व उपक्षित वस्त्यांमधून राहाणारी माणसं ही आपल्या समाजाचे एक अंगच आहे. त्यांनाही दिवाळी साजरी करता आली पाहिजे आपल्या आनंदात त्यांना सहभागी करून घेण्यासाठी तर आपण सर्व वर्धकांच्या घरातून शक्य तेवढ्या फराळाचे एकत्रीकरण करतो व ते अशा वस्त्यांमध्ये जाऊन वाटतो. अशा कार्यक्रमातून आपण त्यांच्याशी जवळीक साधत असतो. 'तुम्ही आमचे आहात' हे नुसते तोंडाने न म्हणता प्रत्यक्ष कृतीने दिलेला तो एक दिलासा असतो व त्यातून आपला दुरावा कमी होत असतो.

अशा कार्यक्रमांचा परिणाम म्हणूनच आपल्याला शेजारच्या वस्तीत अभ्यासवर्ग घेतांना काही अडचण आली नाही. तेथील राहिवाश्यांचं सहकार्य हे मनापासून होतं. हे आपल्यालाही जाणवलं होतं. निकोप सामाजिक अभिसरणाचं हे एक बोलकं उदाहरण

तसेच दिवाळीच्या वेळेस आपण रिमांड होम, अनाथाश्रम, 'निवारा' सारखे वृद्धाश्रम, मुक्तांगण सारखी केंद्रे व ससून, औंध अशी रुग्णालये येथेही भेट देऊन फराळ वाटप करून त्यांच्याशी संवाद साधून एक विश्वास त्यांना देत असतो.

सध्या पाश्चात्यांचं अनुकरण करण्याची एक प्रथाच पडत चालली आहे. नवीन वर्षाचे स्वागत करताना असणारे धुंद वातावरण, होणारे संपत्तीचे प्रदर्शन याचेही आकर्षण आजच्या युवकाला वाटत आहे व त्याचाच परिणाम सध्याच्या गणेशोत्सवा- वरही दिसून येतो. लोकमान्यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक रूप दिले ते हिंदू समाजाला एकत्र करण्यासाठी; पण सध्या एकासमोर एक दोन मंडळे असतात. मूळ उदात्त उद्देश कुठे राहिला आहे त्यात?

पुणेकरांचा आवडता उत्सव असल्याकारणाने हा एक श्रीमंत उत्सव आहे. पण यात जमा होणाऱ्या पैशाची नको तशी उधळपट्टी होताना आपण पाहातो. मनोरंजन, सजावट जरूर आवश्यक आहेत पण जमणाऱ्या वर्गणीतील काही टक्के हिस्सा तरी समाजकारणासाठी, समाजहितासाठी खर्च व्हायला हवा असं वाटतं.

एक दगडू शेठ, केसरीवाडा यासारखी काही थोडी गणपती मंडळे सोडली तर समाज प्रबोधनाचे कार्यक्रम होतात तरी कोठे?

या गणेशोत्सवाला एक शिस्तबद्ध स्वरूप यावं म्हणून, लोकांपुढे एक चांगला आदर्श ठेवावा म्हणून तर आपण आपल्या अल्प कुवतीनुसार विसर्जन मिरवणुकीत आपली पथके घेऊन सहभागी होतो. आपली झांजा, लेझीम, टिपऱ्या, दिंडी, ध्वजदल, वेत्रचर्म याचबरोबर बालवाडीच्या मुलांनी सादर केलेले 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयावरचे अभिनय गीत हे सर्व आता विसर्जन मिरवणूकीचे आकर्षण ठरत आहेत व त्यांचे अनुकरणही वाढत आहे ही एक आनंदाचीच गोष्ट व उमद वाढविणारी सुद्धा.

आपल्या समाजाला एकजिनसी बनविण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून जर आपण आपले सण आणि उत्सव मनापासून पाळले तर एक समृद्ध भारत बलसंपन्न करण्यासाठी लागणारा एकजिनसी समाज निर्मिण्याच्या प्रयत्नांचे आपण वाटेकरी असू यापेक्षा आनंदाची ती दुसरी गोष्ट कोणती?

**— जितेंद्र पवार**

## आशेची किरणे

■ स्वप्नील पोफळे – रामकृष्ण शाखेतील ८ वीतील चिमणासा वर्धक. घरची परिस्थिती बेताची, मूर्ती जरी लहान असली तरी प्रबळ विचारशक्ती व मनही मोठे त्यानी आपल्या खाऊचे, फटाक्यांचे, स्पर्धेतील निरनिराळ्या बक्षिसांचे असे सर्व पैसे बँकेत साठविले व वाढदिवसाच्या दिवशी ही सारी एक हजार रुपयांची ठेव आपल्या मातृरूपी 'स्व'रूप वर्धिनिला अर्पण केली. लहानपणापासून जर अशी त्यागी वृत्ती मनात तेवत असेल तर उज्ज्वल भवितव्याची नांदी नेहमीच गर्जत राहील यात शंका नाही.

जागा, जात, जमात यावर यश अवलंबून नसतं. यश हे जिद्द, परिश्रम, सातत्य व विद्वत्ता यावर अवलंबून असतं. या तीनही गुणांची अखंड कास धरून याही वर्षी चैत न्य तेंडुलकरने शैक्षणिक क्षेत्रातील आपले कर्तृत्व दाखवून दिले. सर्व विपरित परिस्थितीवर मात करून बी. ई. च्या शेवटच्या वर्षात त्याने ६८% गुण मिळवून आपली उज्ज्वल परंपरा पुढे चालू ठेवली आहे.

ज्ञानेश पुरंदरेनेही यावर्षी आपले कर्तृत्व पुन्हा सिद्ध केले आहे. 'प्रतिकूल तेच घडेल' हा सावरकर मंत्र ध्यानी धरून सर्व प्रतिकूलतेचे अनुकूलतेत रुपांतर करण्याचे प्रात्यक्षिक ज्ञानेशने सर्वांना दाखविले आहे. त्याने डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनियरिंग या परीक्षेत ७२% गुण मिळविले आहेत.
सध्या तो बजाज ऑटोमध्ये काम करतो व बाकीचा सर्व वेळ वर्धिनीचे काम करतो.

सुवर्णा बर्डीवाले इ. १०वी ची विद्यार्थीनी आपल्या समोरच्याच उपेक्षित वस्तीत राहाते. 'आकार' हा प्रकल्प सुरू करणाऱ्या मुलींपैकी ती एक. 'आकार' प्रकल्पासाठी जागा उपलब्ध न झाल्याने सुवर्णा तो प्रकल्प स्वत:च्या एका खोलीच्या घरात, स्वत:च्या १० वी च्या अभ्यासाचे स्तोम न माजविता अत्यंत आत्मीयतेने घेते.

मंगला कुडलिंगार या नुकत्याच दहावी झालेल्या विद्यार्थीनीने स्वत:च्या पहिल्या पगारातून घरची परिस्थिती फारशी चांगली नसतानाही देणगी दिली.

रोहिणी तेंडुलकर इ. ११ वी ही शांत, अबोल वाटणारी मुलगी, परंतु यंदाच्या गणेशोत्सव कार्यक्रमात तिने पथक प्रमुखाची जबाबदारी अत्यंत उत्कृष्टरीत्या पार पाडून आपले नेतृत्वगुण सिद्ध केले आहेत.

व्यसनमुक्ती केंद्रामध्ये अमित एका माणसाला फराळ देण्यासाठी गेला त्यावेळी त्या माणसाच्या डोळ्यातून पाणी आले. तो म्हणाला की असेच रोज घरी माझ्या मुलाने मला खायला दिले असते तर मी व्यसनाधीन झालोच नसतो. माझ्या व्यसनाला माझ्याइतकेच माझे कुटुंबदेखील कारणीभूत आहे. ह्या प्रतिक्रिया ऐकून मुलांना काय वाटले ते आम्ही विचारले नाही परंतु दुसऱ्या दिवसापासून आमच्या मुलांच्या डायरीत आम्ही आई वडिलांच्या पाया पडलो हे वाचायला मिळाले.

*शाखेतल्या एका मुलाचा वाढदिवस होता म्हणून त्याला घरी शुभेच्छा देण्यासाठी गेलो असताना त्याच्या वडिलांनी त्याच्या धाकट्या भावाला विचारले की पुढच्या महिन्यात तुझ्या वाढदिवसासाठी काय करायचे? तेंव्हा तो छोटासा वर्धक म्हणाला की, 'माझ्या वाढदिवसापासून तुम्ही दारू सोडा.'*

■ *शाखेतल्या एका मुलाला शाळेत जबरदस्त लागले. तो जिन्यावरून गडगडत आला. शाळेतील शिक्षकांना त्यांचे घर माहीत नव्हते. तेवढ्यात शाखेत आलेला पाचवीतला राहूल तेथे पोहोचला. त्यांनी त्याच शाळेतल्या शाखेतल्या वरच्या वर्गातील मुलांना बोलावून घेतले व शिक्षकांच्या साह्याने त्याला दवाखान्यात नेले व घरी पोहोचविले.*

कोण घेईल माझा वसा
रोज रोज जळण्यासाठी, उजळण्यासाठी?
सूर्यदेवाच्या प्रश्नानेच केवळ
फिरवल्या साऱ्यांनी पाठी
आम्हाला सुख हवे पण त्रास नको
रोज रोज काम करण्याचा जाच नको
जळणे। अन् दुसऱ्यासाठी।
चढली कपाळावर आठी
कोपऱ्यातली एक पणती मिणमिणती
वदली सत्वर देवा; सूर्य देवा ।
अंगात प्राण जोवर तोवर
करीन तुझी सेवा ।

**अनुवाद श्री. शिरीष पटवर्धन**

## • विचार आणि आचार •

*काही वेळा वर्धिनीसाठी पैसे मागायला गेलो म्हणजे देणगीदार विचारतात की पैसे कशासाठी हवेत? कसे खर्च करणार? आणि साहजिकपणेच त्यांचा सल्ला असतो. पैसे जपून वापरा हं!*

- *स्वरूप वर्धिनीत झांजांचे पथक खेळण्यासाठी झांजा बांधण्याची तयारी चालू होती. बाहेर झांजांना मुठ बांधण्यासाडी १० रु. प्रत्येक झांज जोडीला मजुरीचे लागत असत. पण एवढे पैसे स्वरूपवर्धिनीने खर्च करणे मुलांना मानवेना. मग तरुणांतील चौघांनी चंग बांधला आणि एकदा तरुणांनी मनावर घेतले की तहानभूक सर्व विसरून मुलांनी सर्व ७५ जोड एका दिवसात सकाळपासून रात्रीपर्यंत बांधून काढले आणि वर्धिनीचे ७५०/- रुपये वाचविले.*
- *प्रयोगशाळेला सहा फुटी उंच कपाट हवयं कशाला? ४/४१/२ फुटी सुद्धा पुरेल म्हणून दिवसभर पावसात हिंडून १० दुकानी चौकशी करून १०००/- रु. चे अर्धे कपाट वर्धिनीसाठी घेतले मी विचारले काचेचे कपाट हवे होते ना? आणि मोठे ६ फुटी हवे होते ना? सुनील म्हणाला कशाला मोठे कपाट सध्या अर्ध्या कपाटात भागेल. आणि २,५०० ऐवजी १,००० रु. पुरेत म्हणून १,५०० रु. परत केले आणि स्वत: पावसात भिजून, आजारी पडून वर्धिनीला वटाव दिला.*
- *समर्थ शाखेतील मुलांना शिकविण्याकरता फळ्याची आवश्यकता होती. युवकांनी बाजारात जाऊन चौकशी केल्यावर एका फळ्याला २०० रु. खर्च येणार आहे असे दिसले. मग वर्धिनीतच साहित्य आणून फळे तयार करायचे ठरले. त्याप्रमाणे रंग, ब्रश, हार्डबोर्ड, खिळे, इ. सामान आणून ७/८ युवकांनी एका दिवसात ७ फळे तयार करून रंग दिला या सर्व*

कामासाठी फक्त ७००/- रुपये खर्च आला व ७००/- रुपये वाचविले.

- परवा एका विद्यार्थ्याच्या घरी गेलो होतो. तेव्हा हे महाशय आपल्या आईवडिलांना शिव्या देत होते व आईवडिल त्याला मारत होते. मी गेल्यावर आईने रडगाणे चालू केले की शाखेत तुम्ही हेच शिकविता का? मी प्रचंड गोंधळात पडलो कारण येथे सर्वच घरात हाच प्रकार आहे. परंतु तेवढ्यात शिरीष पटवर्धन व देसाई सरांची आठवण झाली व मी पटवर्धन सरांसारखे फिरवून त्या मुलाला व त्याच्या घरच्यांना प्रश्न विचारले व थोडेसे त्या प्रश्नापासून दूर नेले व नंतर त्यास भगवान बुद्ध व आंबेडकरांसमोर शपथ घेण्यास सांगितले. मधल्या वेळात वस्तीतील ९-१० मुले जमली व शेवटी माझ्या सांगण्यावरून सर्वांनीच शपथ घेतली व आता शिव्या दिल्यास दहा गुद्दे व हट्ट केल्यास सर्वांचा मार असा प्रसाद मिळतो त्यामुळे तो मुलगा फारच सरळ झाला आहे.

***

## असाही सहभाग हवा आहे

१) आपण आपल्या मित्रांना ह्या संस्थेची माहिती सांगू शकता.

२) सहज जाता जाता हितचिंतकां- बरोबर संस्थेची वास्तू पाहायला येऊ शकता.

३) दिवसातला तास- दिडतास संस्थेसाठी खर्च करू शकता.

४) शक्य असेल तर आर्थिक मदत करू शकता.

५) स्वत: नाही तरी हस्ते - परहस्ते आर्थिक सहाय्य करू शकता.

६) आपल्याकडील अनुभवांचा फायदा आम्हाला देऊ शकता.

## आवाहन आर्थिक मदतीचे

आपणांस हे माहितीच आहे की, कोणत्याही प्रकारच्या सरकारी अनुदानाशिवाय कुठल्याही प्रकारचे कर्ज न काढता वर्धिनीची वाटचाल सुरू आहे.

मुलांचे शिक्षण, सहली, शिबीरे, व्यायामशाळा, बालवाडी, आजोळ, अभ्यासिका, ग्रंथालय, प्रयोगशाळा इ. अनेक उपक्रम करत असतांना आर्थिक आघाडीचा तोलही सांभाळावा लागतो. गेल्या शैक्षणिक वर्षांत सुमारे अडीच लाख रुपये यासाठी खर्च झाले आहेत. आपल्यासारख्या सुहृदांच्या सहाय्यानेच हे शक्य होत आहे. हे काम अधिक गतीने करावे असा मानस आहे. अर्थातच त्यासाठी अधिक अर्थसाह्याचीही आवश्यकता आहे. ज्या प्रमाणात आपण हा भार कमी करू शकाल, जितके अधिक सहाय्य देऊ शकाल, तेवढे अधिक लक्ष आम्हाला उद्याच्या राष्ट्रीय संपत्तीकडे, गुणी विद्यार्थ्यांकडे देता येईल.

सध्याची वास्तू, कामाचा पसारा लक्षात घेता अपुरी पडू लागली आहे. म्हणून आपल्याला अधिक दोन मजले बांधावयास लागणार आहेत. त्यासाठी म. न. पा. ने परवानगीही दिली आहे. बांधकाम सुरू झाले आहे. त्यासाठी १५ लाख रुपये लागणार आहेत त्यापैकी आमच्याजवळ ६ लाख रुपये आहेत. उरलेल्या रकमेसाठी शक्य त्या प्रमाणात अधिकात अधिक सहाय्य आपण करावे ही प्रार्थना!

धनादेश 'स्व'रूपवर्धिनी या नावाने काढावा ही विनंती.

(संस्थेला आयकराची ८० जी कलमान्वये सवलत प्राप्त आहे.)

## अनुकरणीय

उन्हाळ्याचे दिवस, उकाडा भरपूर, अंगातून घामाच्या धारा लागलेल्या तरी आपल्या व्रात्य स्वभावाप्रमाणे राहुल एकावर एक दोन सदरे घालून आलेला. सरांनी त्याला विचारले, "अरे, एवढे उकडते आहे आणि तरीही तू एकावर एक दोन सदरे का घातलेस?" तेव्हा तो म्हणाला, "आपल्या शाखेतला माझा मित्र रोज फाटका सदरा घालून येतो ते मला बघवत नाही म्हणून त्याच्यासाठी एक सदरा आणला आहे."

✡ ✡ ✡

## प्रेरणा

हल्ली सर्वत्र जास्त पगार, जास्त पैसे असा सूर ऐकू येतो. परंतु वर्धिनीत काम करणारी माणसे दिलेला पैसा जेवढे काम करतो त्यापेक्षा जास्त घेतो, या जाणीवेने घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असताना दिलेले ४००/- रुपये जास्त होतात. मला ४००/- नकोत ३००/- च रुपये पुरेत म्हणून १००/- रुपये परत करतात. असे अनेक सुखद धक्के मिळत असतात.

✡ ✡ ✡

## एक राजहंस

दिवाळीतले शिबिर, वर्धिनीच्या शिरस्त्याप्रमाणे कार्यक्रम वेळेवर सुरू झाला पाहिजे असा आग्रह, कार्यक्रम दुपारी ४ वाजता ठरला होता. मुले कार्यक्रमाला हजर राहाण्यासाठी स्वच्छतागृहात गेली. नेहमीप्रमाणे पाणी वगैरे पिऊन कार्यक्रमाला चार वाजता हजर राहावे अशी सर्वांचीच धडपड चालू होती. त्यामुळे स्वच्छतागृहात गर्दी झाली. सर्वजण त्या तुंबलेल्या स्वच्छतागृहाचा तसाच उपयोग करू लागले. पण एका विद्यार्थ्याला ते पाहावले नाही. त्याने कार्यक्रम वेळेवर सुरू झाला पाहिजे म्हणून कसलाही विचार न करता, कसलीही लाज, घाण न मानता स्वहस्ते ते स्वच्छतागृह स्वच्छ केले व कार्यक्रम वेळेवर सुरू झाला. बाकीचे विद्यार्थी बघतच राहिले. माझ्या मात्र मनात असे आले

"एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख,
होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एक ।।
एके दिनी परंतु; पिल्लास त्या कळाले
भय वेड पार त्याचे; वाऱ्यासवे पळाले,
पाण्यात पाहताना चोरुन या क्षणेक
त्याचेच त्या कळाले; तो राजहंस एक!"

✡ ✡ ✡

## जिज्ञासा

ज्ञानप्रबोधिनीच्या दुग्धगटाचा प्रकल्प पुण्यात चालू होता. परंतु कै. आप्पा पेंडसे यांच्या कल्पनेप्रमाणे शहरातल्या उपेक्षित वस्त्या वाढवायच्या नसतील तर खेड्यातच उद्योग सुरू केले पाहिजेत. म्हणूनच त्यांनी हा प्रकल्प गुंजवणे खोऱ्यात चालू केला. कैक वर्षे तो यशस्वीपणे चालूही होता.

तो प्रकल्प चालवण्यासाठी श्री. नंदकुमार कानडे हे खास लक्ष देत असत. एकदा त्यांचे व्याख्यान त्या प्रकल्पासंबंधी झाले. त्यांनी त्या प्रकल्पाची सविस्तर माहिती सांगितल्यावर एका आठवीतल्या विद्यार्थ्याने त्यांना विचारले, "तुम्ही बाकी सर्व प्रकल्पाची माहिती सांगितली पण तिथे तुम्ही शिक्षित कामगार कोठून आणलेत" आठवीतल्या मुलाच्या कल्पनेची ही झेप पाहून श्री. कानडे थक्क झाले.

• • •

**साधकोंका संघटन राष्ट्र सेवा में हो समर्पण।**

## ५) समर्थ रामदास शाखा

२२/१ मंगळवार पेठ,
पारगे चौक, पुणे ११
शाखा प्रमुख - श्री. माधव पुरोहित
शाखा पालक- श्री. प्रमोद बेहेरे

सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

## ६) आजोळ

प्रमुख — सौ. बागेश्री पोंक्षे

सोम. ते शुक्र. सायं. १ ते ५

## ७) बालवाडी (पाकोळी)

प्रमुख — श्री. पुष्पा नडे

सोम. ते शुक्र. स. १० ते १
शनि. ९ ते १०.३०

## ८) कार्यालय वेळ

सोम. ते शनिवार स. ११ ते ५



House of Forms, Pune. Phone:447441 (35)

# THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950
## SCHEDULE VIII [Vide Rule 17 (1)] परिशिष्ट आठ [नियम १७ (१) पहा]

Name of the Public Trust
सार्वजनिक ट्रस्टचे नांव

Registration No.
रजिस्ट्रेशन नोंदणी क्र.

Balance Sheet as at रोजी संपणाऱ्या वर्षाचे स्थिती विवरण

| FUNDS AND LIABILITIES निधी आणि देयता | Rs. रुपये | Rs. रुपये |
|---|---|---|
| **Trusts Funds or Corpus -** ट्रस्ट फंड किंवा स्थायी फंड | | 21,527.12 |
| Balance as per last Balance Sheet मागील स्थिती विवरणप्रमाणे असलेली शिल्लक | | |
| Adjustment during the year (give details) चालू वर्षात करण्यात आलेला बदल (विवरण द्या) | | |
| **Other Earmarked Funds-** इतर विशिष्ट कामाकरितां ठेवलेला निराळा फंड Building fund (As perSch.A) | | 21,94,660.40 |
| (Created under the Provisions of the Trust Deed or Scheme or out of the Income) (ट्रस्ट-डीडच्या तरतुदीखाली किंवा योजनेद्वारे किंवा उत्पन्नापासून निर्माण केलेला) | | |
| Depreciation Fund — अवमूल्यन निधी | | |
| Sinking Fund — ऋणनिवारणनिधी | | |
| Reserved Fund — राखीव निधी | | |
| Any other Fund — इतर कोणताही निधी | | |
| **Loans (Secured or Unsecured)** कर्जे (तारणांनी सुरक्षित किंवा सुरक्षित न केलेली) | | |
| From Trustees — ट्रस्टीकडून | | |
| From Others — इतरांकडून | | |
| As per Schedule G ) | | 33,001.00 |
| **Liabilities — देयता** | | |
| For Expenses Audit Fee खर्चासाठी | 1,950.00 | |
| For Advances — आगाऊ रकमाबाबत | | |
| For rent and Library — भाडे किंवा इतर | 675.00 | 2,625.00 |
| other deposits Deposit अनामत रकमेबाबत | | |
| For Sundry credit balances — किरकोळ शिल्लक बाकी बाबत | | |
| **Income and Expenditure Account** आयव्यय — लेखा | | |
| Balance as per last Balance Sheet मागील स्थिती विवरणप्रमाणे असलेली शिल्लक | (1,69,889.65 | |
| Less: Appropriation, if any वजा असल्यास कोणताही खर्च अधिक/वजा | 63,084.18 | (1,69,887.65) |
| Add : Surplus / Less : deficit as per Income and Expenditure Account आय व्यय पत्रकात दाखविल्याप्रमाणे अधिक किंवा तुटीची रकम | | |
| **Total Rs. एकूण रुपये** | | 21,45,010.05 |

| PROPERTY AND ASSETS मालमत्ता | Rs. रुपये | Rs. रुपये |
|---|---|---|
| **Immoveable Properties - [at cost]** स्थावर मालमिळकत (As per Schedul 'B') | | 13,35,879.31 |
| (Suitably classified giving mode of valuation) | | |
| Additions or deductions (including those for depreciation) if any, during the year. (मूल्यांकनाची रीत देऊन योग्य रीतीने वर्गवारी केलेल्या) चालू वर्षात असल्यास वाढ किंवा घट (अवमूल्यनाची घट धरून) | | |
| **Investments:-** गुंतवलेल्या रकमा (As per Schedule 'C') | | 3,86,000.00 |
| Note: The market value of the above investment Rs. वरील गुंतवणूकीची बाजार भावाप्रमाणे किंमत रु. | | |
| **Furniture & Fixtures** लाकडी सामान व स्थिर वस्तु (As per Schedule 'D') | | 1,13,682.62 |
| Balance as per last Balance Sheet मागील विवरणप्रमाणे स्थिती | | |
| Additions during the year अधिक चालू वर्षातील वाढ | | |
| Less: Sales during the year वजा चालू वर्षातील विक्री | | |
| Depreiciation up to date वजा अवमूल्यन | | |
| **Loans (Secured or Unsecured): Good/doubtful** कर्जे (तारणी / बिगर तारणी) चांगले/संशयास्पद | | — |
| Loan Scholarships — कर्जे छात्रवृत्या | | |
| Other Loans — इतर कर्जे | | |
| **Advances — आगाऊ रकमा** | | |
| To Trustees — ट्रस्टींना दिलेल्या | | |
| To Employees — सेवकांना | | |
| To Contractors — कंत्राटदारांना | | |
| To Lawyers — कायदेशीर सल्लागारांना | | |
| To Others — इतरांना दिलेल्या | | |
| **Income Outstanding — उत्पन्न येणे बाकी** * | | |
| Rent — भाडे | | |
| Interest — व्याज | | 5,000.00 |
| Other Income — इतर उत्पन्न | | |
| **Cash & Bank Balance** रोख आणि बँकेतील शिल्लक | (As per Sch.'F') | 3,04,448.12 |
| [a] In current Account- बँकेतील चालू खात्यातील | | |
| [b] With the Trustee - ट्रस्टीजवळ असलेली | | |
| [c] With the Manager - व्यवस्थापकाजवळ असलेली | | |
| **Income & Expenditure Account** आयव्यय लेखा | | |
| Balance as per Balance Sheet मागील विवरणप्रमाणे | | |
| Less: Appropriation, if any वजा असल्यास कोणताही खर्च अधिक/वजा | | |
| Add : deficit / Less : Surplus as per Income and Expenditure Account आय व्यय पत्रकात दाखविल्याप्रमाणे अधिक किंवा तुटीची रकम | | |
| **Total Rs. एकूण रुपये** | | 21,45,010.05 |

As per our report of even date
त्याच तारखेच्या आमच्या अहवालाप्रमाणे

*Income Outstanding: येणे बाकी
(If accounts are kept on cash basis)
(जर हिशेब रोख पद्धतीने लिहिलेले असतील)

| | |
|---|---|
| Rent | भाडे |
| Interest | व्याज |
| Other Income | इतर उत्पन्न |
| Total Rs. | एकूण रुपये |

The above Balance Sheet to the best of my/our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and/ Assets of the Trust.
माझ्या/आमच्या उत्तम माहितीप्रमाणे वरील स्थितीविवरणात दिलेल्या ट्रस्टच्या निधी आणि देयता मालमत्तेचा हिशोब खरा आहे.

Dated at
दिनांक

Chartered Accountants चार्टर्ड अकौंटन्ट
Auditors ऑडीटर्स

Dated at ___________
दिनांक

TRUSTEE ट्रस्टीची सही

House of Forms, Pune. Phone:447441 (35)

# THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950
## SCHEDULE IX [Vide Rule 17 (1)] परिशिष्ट नऊ [नियम १७ (१) पहा]

Name of the Public Trust
सार्वजनिक ट्रस्टचे नांव

Registration No.
रजिस्ट्रेशन नं.

### Income and Expenditure Audited Account for the year ending 31.3.91
३१.३.९१ ला संपणाऱ्या वर्षाकरिता आय-व्यय लेखा

| EXPENDITURE व्यय | Rs. रुपये | Rs. रुपये | INCOME आय | Rs. रुपये | Rs. रुपये |
|---|---|---|---|---|---|
| To Expenditure in respect of properties :- मालमत्तेसंबंधी खर्च | | | By Rent [accrued] येणे / भाडे * [realised] वसूल | | |
| Rates, Taxes, Cesses स्थावर कर, कर, सेस | 25,498.00 | | By Interest [accrued] येणे / व्याज * [realised] वसूल | | |
| Repairs and maintenance दुरुस्ती व व्यवस्था | 10,406.40 | | On Securities प्रतिभुतीपासून | | |
| Salaries पगार | | | On Loans ऋणापासून | | |
| Insurance विमा | | | | | |
| Depreciation [by way of Provision or adjustments] अवमूल्यन (तरतूद किंवा समायोजनाद्वारे) (As per Sch.'B') | 56,786.49 | 92,690.89 | On Bank Account बँक खात्यापासून | | |
| Other Expenses इतर खर्च (As per Sch.1) | | 37,343.62 | | | |
| To Establishment Expenses स्थापना खर्च (As per Sch.2) | | | By Dividend लाभांश (डिव्हिडंड) | | |
| To Remuneration to Trustees ट्रस्टींना मानधन | | 6 | | | |
| To Remuneration [in the case of a math] to the head of the math including his household expenditure, if any. (मठ असल्यास) मठाधिपतीला मानधन त्याच्या घरगुती खर्चासह | | — | By Donations in cash or kind देणग्या रोख किंवा वस्तू स्वरूपात | | 3,91,272.75 |
| | | — | By Grants अनुदान | | |
| To Legal Expenses कोर्ट खर्च | | 650.00 | By Income from other sources (in details as far as possible) इतर साधनापासून झालेले उत्पन्न (शक्य तितका विस्तृत तपशील द्यावा) | | |
| To Audit Fees ऑडीट फी | | 581.00 | | | |
| To Contribution and Fees वर्गणी व फी | | — | | | |
| To Amount Written off बुडत खात्यात टाकलेली रक्कम<br>a) Bad Debts अ) बुडीत कर्ज<br>b) Loan Scholarships ब) कर्ज स्वातील छात्रवृत्या<br>c) Irrecoverable rents क) वसूल न होणारे भाडे<br>d) Other items ड) इतर बाबी | | | | | |
| To Miscellaneous Expenses किरकोळ खर्च | | 4,536.55 | | | |
| To Depreciation अवमूल्यन (As per Sch.'D') | | 33,614.41 | | | |
| To Amounts transferred to Reserve or specific Funds सुरक्षित वा राखीव फंडाला स्थानांतरित केलेल्या रकमा | | — | | | |
| To Expenditure on objects of the trust ट्रस्टच्या उद्देशावर केलेला खर्च<br>a) Religious अ) धार्मिक<br>b) Educational ब) शैक्षणिक<br>c) Medical Relief क) वैद्यकीय मदत<br>d) Relief of poverty ड) गरिबांस मदत<br>e) Other charitable objects इ) इतर धर्मादाय उद्देशावर (As per Sch. 3) | | 1,58,772.10 | By Transfers from Reserve सुरक्षित निधीतून काढलेल्या रकमा | | |
| To Surplus carried over to Balance Sheet अधिक रक्कम स्थिती-विवरणास स्थानांतरित | | 63,084.18 | By Deficit carried over to Balance Sheet तुटीची रक्कम स्थिती-विवरणाला स्थानांतरित | | |
| Total Rs. एकूण रु. | | 3,91,272.75 | Total Rs. एकूण रुपये | | 3,91,272.75 |

* Strike out whichever is not applicable.
* गैरलागू खोडून टाकावे.

As per our report of even date
हा तारखेच्या आमच्या अहवालाप्रमाणे

Dated at ____________
दिनांक

TRUSTEE ट्रस्टी सही

Chartered Accountant
चार्टर्ड अकौंटन्ट

Auditors
ऑडिटर्स

Dated ............
दिनांक